जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -  दिनांक - ०७/०१/२०२४**

पोलीस उपआयुक्त परि-५ पुणे शहर

**बाल गुन्हेगार व पालक मेळावा राबविणेत आलेले बाबत**

पुणे शहरांत अलीकडे घडणारे गंभीर गुन्हयाचा आढावा घेतला असतां असे निदर्शनांस आले की, सध्या बाल गुन्हेगारांकडून वारंवार गंभीर स्वरुपाचे गुन्हे घडत, बहुतांश गंभीर गुन्हयांमध्ये बाल गुन्हेगारांचा सहभाग आढळून येत आहे. बाल गुन्हेगारांकडून होत असलेल्यां गंभीर गुन्हयांसंबंधाने आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक असलेने सर्व पोलीस स्टेशनकडून अभिलेखावरील बाल गुन्हेगारांचा व त्यांचे पालकांचा मेळावा आयोजित करणेत यावा. तसेच सदर मेळाव्यांमध्ये जास्तीत जास्त बाल गुन्हेगार व पालक यांना उपस्थित सहभागी करुन घेवुन त्यांचे समुपदेशन/ कॉन्सलिंग हे खाजगी कॉन्सलर यांचेकडून करणेबाबत आदेश दिलेले होते.

वरीलप्रमाणे मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे प्राप्त आदेशांन्वये परिमंडळ -५ कार्यक्षेत्रातील स.पो.आ.वानवडी व हडपसर विभागातील वेगवेगळया पो.स्टे.कडील एकुण ६८ बाल गुन्हेगार व ७६ पालक यांना मेळाव्यांमध्ये सहभागी करुन घेवून बाल गुन्हेगारांना गुन्हे करणेपासून त्यांचे मन परावृत्त करणेबाबत समुपदेशन करणेत आलेले आहे. तसेच १० वी व १२ वी शिक्षण घेत असलेले बाल गुन्हेगारांना त्यांचे पुढील उज्वल भवितव्यांचे दृष्टीने शिक्षण किती महत्वाचे आहे याबाबत माहिती व संदेश देवून त्यांना पुढे गुन्हे न करणेबाबत आवाहन करणेत आलेले आहे.

सदरचा मेळावा मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ०५ पुणे शहर श्री.आर राजा, यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे परिमंडळ-५ चे विभागीय मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.शाहुराजे साळवे,वानवडी विभाग,पुणे शहर व श्रीमती अश्विनी राख,हडपसर विभाग,पुणे शहर यांनी व त्यांचे विभाग पो.स्टे.कडील प्रभारी अधिकारी व बाल स्नेही अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेली आहे.